सकाळ TODAY

शनिवार,
२६ मार्च २०२२

# 'कमला'मध्ये लेखापरीक्षण कार्यशाळा

**टेंबलाईवाडी, ता. २५ :** शिवाजी विद्यापीठ, कमला महाविद्यालयामार्फत विद्यापीठ संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त संस्थांची विद्याविषयक शैक्षणिक लेखापरीक्षण कार्यशाळा कमला महाविद्यालयात झाली.

विद्यापीठाचे उपकुलसचिव विलास सोयम् म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ संलग्न २५० महाविद्यालयांचे ॲकॅडमिक ऑडिट या शैक्षणिक वर्षामध्ये करून घ्यावयाचे असून, पहिल्या टप्प्यात ७० महाविद्यालयांचे करून घेण्यात आले. ॲकॅडमिक ऑडिटसाठीची माहिती भरताना महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्या शंकांचे निरसन करण्याच्या उद्देशाने सांगली, सातारा, कोल्हापूर येथे कार्यशाळांचे आयोजन केले.' प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी स्वागत केले. ॲकॅडमिक ऑडिट समितीतील डॉ. पी. एन. चौगले, प्राचार्य डी. आर. माने कला व वाणिज्य महाविद्यालय, कागल येथील प्राचार्य डॉ. योजना जुगळे, श्री अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे (हातकणंगले) प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालयाचे (शिराळा) येथील प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर आदी उपस्थित होते.

ॲकॅडमिक ऑडिट करून घेताना अर्ज व त्यात माहिती भरताना कोणत्या अडचणी येतात, याबद्दल डॉ. प्रवीण चौगले यांनी मार्गदर्शन केले. ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले.



**टेंबलाईवाडी : कमला महाविद्यालयात शैक्षणिक लेखापरीक्षण कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले.**